महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.६५४/एसएम-२ दिनांक:- १५ मार्च, २०२४

# मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
संत गाडगे महाराज ग्राम विकास संस्था,
मालेगाव, जि. वाशिम.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

संत गाडगे विकास संस्था, मालेगाव, जि. वाशिम संचलित ग्लोबल इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, गट क्र.५९, अमानी, ता. मालेगाव, जि. वाशिम.

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.६५४/एसएम-२, दि. १८.०८.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत संत गाडगे विकास संस्था, मालेगाव, जि. वाशिम या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ग्लोबल इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, गट क्र.५९, अमानी, ता. मालेगाव, जि. वाशिम (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई.) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून संत गाडगे विकास संस्था, मालेगाव, जि. वाशिम संचलित ग्लोबल इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, गट क्र.५९, अमानी, ता. मालेगाव, जि. वाशिम (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई.) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

Scanned with OKEN Scanner

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
६. शिक्षणाधिकारी,(प्राथमिक/माध्यमिक), जि.प., वाशिम.
७. निवड नस्ती एसएम-२ (६५४/२३).

Scanned with OKEN Scanner

वाचा :- १) शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस -२०२३/प्र.क्र.६५४/एसएम-२ दिनांक १५ मार्च २०२४
२) शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांचे जा.क्र.शिउसं/प्राथ/क/२९७१/२०२४ दिनांक १६/०४/२०२४

जा.क्र.जिपवा/प्राशि/खातेमान्यता/2906/२०
कार्यालय शिक्षण विभाग(प्राथ)जि.प.वाशिम
दिनांक. :- 28/6/2024

आदेश

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयम) अधिनियम २०१२ आणि महारष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम) नियम २०२० अंतर्गत शैक्षणीक वर्ष २०२४-२५ पासून संत गाडगे महाराज ग्राम विकास संस्था ता.मालेगाव जि.वाशिम व्दारा संचालित ग्लोबल इंटरनॅशनल इग्लिश स्कुल अमानी ता.मालेगाव जि.वाशिम यांना नवीन शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) इयत्ता १ ते १२ वी सर्व शाखा , इंग्रजी माध्यम राज्य मंडळ ) स्वयंअर्थ सहाय्यीत तत्वावर नविन शाळा / दर्जावाढ करण्याकरीता , अटी व शर्तीसह मान्यता पत्र दिले . संदर्भीय पत्र क्र. ०२ अन्वये सदर संस्थेस नवीन शाळा सुरू करण्याची मान्यता, पुढील अटी व शर्तीस अधिन राहून प्रथम खाते मान्यता प्रदान करण्यात येते

| अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | नवीन शाळा दर्जावाढ | मंडळ संलग्नता | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वाशिम | संत गाडगे महाराज ग्राम विकास संस्था ता.मालेगाव जि.वाशिम | ग्लोबल इंटरनॅशनल इग्लिश स्कुल गट क्रमांक ५९ अमानी अमानी ता.मालेगाव जि.वाशिम | सी.बी.एस.ई | इंग्रजी माध्यम | इयत्ता १ ते ८ |

**अटी व शर्ती :-**

१. सदर शाळेने बालांकचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांचे तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. संबंधीत शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम २००९ मधील तरतुदीची पुर्तता करून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू करण्यास खालील प्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्वबाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत प्रथम मान्यतासाठी संबधींत जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०२४-२०२५ करीता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले असल्यासे शाळा स्थापन करण्यासाठी विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करणसाठी शासन निर्णयाचे दिनांकापासून अठरा महिण्याच्या आत शाळा सुरू करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्दबातल ठरले.

क) शासन निर्णय दि. २० जुन २०१२ मध्ये विहीत केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी.बी.सी. ई. मंडळाशी संलग्नते करीता ना हरकत प्रमापणपत्र मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक (जिल्हाशिक्षणाधिकारी (माध्यमिक (शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधीत मंडळाच्या संलग्नता नाहरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करून संबधित शाळा विहीत निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासनास मंडळ संलग्नतेसाठी न हरकत प्रमाणपत्र देईल.

३. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस (१) शासनाच्या वेळोवेळी होणाऱ्या आदेशाची व कार्यपध्दती तसेच २) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यती शाळा (स्थापन व विनिमय ) अधिनियम २०१२ सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी अधिकनियम २००९ मधील तरतुदीची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरचे प्रथम मान्यता देण्याची पुढील कार्यवाही करावी.

५. संस्थेचे शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणते बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणीसाठी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेल्या परवानगी आपोपाच रद्द समजण्यात येईल.

६. यु-डायस या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा जिल्हानिहाय Udise (unified District District Information System for Education)मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर परवानगी प्राप्त शाळा बाबत प्रवर्गात म्हणून स्वतंत्र नोंद करून क्रमांक क्र प्राप्त करून घेण्याबाबतची जबाबदारी संबंधीत संस्थेवर राहील या बाबतची कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकलप संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे त्याप्रमाणे संस्थेने , सर्व संबधीतांच्या माहिती करीता स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशाव्दारावर लावणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियामांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी(प्राथ)
जिल्हा परिषद वाशिम

**प्रतिलीपी :-**

१) मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.

२) मा.गटशिक्षणाधिकरी पंचायत समिती मालेगाव यांना माहिती करीता.

**३) अध्यक्ष/सचिव, संत गाडगे महाराज ग्राम विकास संस्था ता.मालेगाव जि.वाशिम**

४) **मुख्याध्यापक, ग्लोबल इंटरनॅशनल इग्लिश स्कुल अमानी ता.मालेगाव जि.वाशिम** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

13.7.24

शिक्षणाधिकारी(प्राथ)
जिल्हा परिषद वाशिम